पेज ३ शॉर्ट सर्किट मुळे आखाड्याला लागली भीषण आग !

पेज ४ मेहकर पंचायत समिती अंतर्गत आधारकार्ड दुरुस्ती करणे

दैनिक
# सेवाशक्ति टाईम्स

https://www.sewashaktitimes.com

मुख्य संपादक
अंकोश जानु राठोड - ९०११५०९८३१

कार्यकारी संपादक
गजानन सरकटे - ८६०५४३३८२२

E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- ६८ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● बुधवार १६ अप्रैल २०२५

## आज चैत्यभूमीवर पूर्वनियोजित भाषण होऊ शकलं नाही, त्या प्रश्नावर एकनाथ शिंदे म्हणाले...

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

**मुंबई :** "भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकराचं स्मारक उभं राहतय. जगाला हेवा वाटाव असं स्मारक उभ राहतय. तमाम देशवासियां साठी ही अभिमानाची बाब आहे. आज बाबासाहेबांचा जयंती उत्सव आहे. बाबासाहेब खरं म्हणजे संविधानाचे शिल्प कार आहेतच, पण माणुसकीचे सुद्धा शिल्पकार आहेत. माणसाने कसं जगावं, शिका, संघित व्हाव, संघर्ष करा, न्याय मिळवा हे बाबसाहेबांच बीद्र वाक्य होतं. म्हणून मी बाबासाहेबांना विन्रम अभिवादन करतो" असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. "आमच सरकार देखील बाबा साहेबांच्या विचारांवर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाने चालणारं आहे. बाबासाहेबांनी लिहिलेली घटना सर्व सामान्यांना न्याय देणारी घटना आहे. म्हणून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती या देशाचे पंतप्रधान झाले. शेतकऱ्याचा मुलगा या राज्याचा मुख्यमंत्री झाला. एक आदिवसी भगिनी या देशाची राष्ट्रपती झाली" या शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकरांच्या कार्याचा गौरव केला. "ही जादू, किमया बाबासाहेबांच्या घटनेची आहे. म्हणून मी पुन्हा एकदा महाराष्ट्रातल्या तमाम जनतेला बाबा साहेबांच्या जयंतीच्या शुभेच्छा देतो" असं एकनाथ शिंदे म्हणाले. आज दादर शिवाजी पार्क चैत्य भूमीवर सरकार च्यावतीने मुख्यमंत्री, दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्ताने अभिवादन केलं. यावेळी एकनाथ शिंदे यांचं पूर्वनियोजित भाषण झालं नाही. यावर पत्रकारांनी एकनाथ शिंदे यांना तुम्ही नाराज आहात का? म्हणून विचारलं. त्यावर ते म्हणाले की. "नाराजी कोणाची? बाबासाहेबांच्या चैत्य भूमीवर जाणं. बाब साहेबांच दर्शन घेणं, त्यांना विनम्र अभिवादन करणं, यापेक्षा दुसरं मोठं काय असू शकतं?" "भाषणापेक्षा बाबा साहेबांच दर्शन मला मोठं होतं. मी सांगू तुम्हाला, प्रत्येकाने बाबासाहेबांचा एकतरी गुण घेतला पाहिजे. बाबा साहेब तुमच्यात ला एक अंश जरी मिळाला, तरी मनुष्यजीवन सार्थक होईल. यापेक्षा दुसरं काय महत्त्वाच " असं नाथ शिंदे म्हणाले.



### 'यापेक्षा दुसरं मोठं काय असू शकतं?'

**आज दादर शिवाजी पार्क चैत्यभूमीवर सरकारच्यावतीने मुख्यमंत्री, दोन्ही उप मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्ताने अभिवादन केलं. यावेळी एकनाथ शिंदे यांचं पूर्वनियोजित भाषण झालं नाही. यावर पत्रकारांनी एकनाथ शिंदे यांना तुम्ही नाराज आहात का? म्हणून विचारलं. त्यावर ते म्हणाले की. "नाराजी कोणाची? बाबासाहेबांच्या चैत्यभूमीवर जाणं. बाबसाहेबांच दर्शन घेणं, त्यांना विनम्र अभिवादन करणं, यापेक्षा दुसरं मोठं काय असू शकतं?" "भाषणापेक्षा बाबासाहेबांच दर्शन मला मोठं होतं. मी सांगू तुम्हाला, प्रत्येकाने बाबासाहेबांचा एकतरी गुण घेतला पाहिजे. बाबासाहेब तुमच्यातला एक अंश जरी मिळाला, तरी मनुष्यजीवन सार्थक होईल. यापेक्षा दुसरं काय महत्त्वाच" असं एकनाथ शिंदे**

## न्यूज INBOX

### डीजेच्या आवाजाने नव्हे मग त्या तरुणाचा मृत्यू कशामुळे ? नाशिक प्रकरणात नवा ट्विस्ट



**नाशिक :** डीजेच्या दणदणाटामुळे नाशिकमध्ये एका 23 वर्षांच्या तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडल्याचे समोर आलं होतं. डिजे जवळ उभ्या असलेल्या नाशिकच्या तरुणाने जीव गमावला. डीजेच्या आवाजामुळेच त्याचा मृत्यू झाला असा पोलिसांना संशय होता, मात्र आता याप्रकरणात आता एक नवा ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. जो तरुण मृत्यूमुखी पडला, त्याला गेल्या काही वर्षांपासून इतरही त्रास असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याचा मृत्यू नेमका कसा झाला हे गूढ कायम आहे.

**नेमकं काय घडलं ?**

नाशिकच्या पंचवटी परिसरात असलेल्या महात्मा फुले नगर येथे रविवारी रात्री डीजे लावण्यात आला होता. मात्र त्याच डीजेच्याजवळ उभ्या असलेल्या नितीन रणशिंगे याला अचानक त्या दणदणाटाचा त्रास जाणवू लागला. डीजेच्या आवाजाने नितीन रणशिंगे या 23 वर्षीय युवकाला त्रास होऊ लागला आणि त्याच्या नाकातून आणि तोंडातून रक्त येऊ लागले. ते पाहून त्याच्या नातेवाईकांनी व मित्रांनी त्याला तात्काळ नाशिकच्या जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. उपचारांदरम्यानच नितीन रणशिंगे यांने अखेरचा श्वास घेतला.डीजेच्या आवाजाने नितीन रणशिंगे याचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. पण त्याच्या मृत्यूनंतर पंचवटी पोलिसांनी अधिक तपास केला असता एक वेगळीच माहिती समोर आली आहे. नितीन हा गेल्या चार वर्षांपासून गंभीर आजाराने ग्रस्त होता, असे पोलीस तपासात समोर आल आहे.दरम्यान तज्ज्ञ डॉक्टरांच्या मते, एखाद्या रुग्णास हृदयाचा त्रास असल्यास अती, मोठ्या आवाजाच्या ध्वनीने त्या व्यक्तीला हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.

## खडसे-महाजन वाद विकोपाला, 'त्या' आरोपानंतर महाजनांनी उचललं मोठं पाऊल; आता थेट...

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील महाजन आणि खडसे यांच्यातील राजकीय संघर्ष संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. काही दिवसांपूर्वी माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले होते. एका पत्रकाराच्या हवाल्याने गिरीश महाजन यांचे एका IAS महिला अधिकाऱ्याशी संबंध आहेत, असा दावा केला होता. आता याच दाव्यानंतर महाजनांनी टोकाची भूमिका घेतली आहे.




**महाजनांकडून कडसेंना नोटीस**

एकनाथ खडसे यांनी आरोप केल्यानंतर गिरीश महाजन यांनी खडसेंच्या नावाने अब्रुनुक सानीची नोटीस पाठवली आहे. या नोटिशीच्या माध्यमातून महाजन यांनी खडसे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची प्रक्रिया चालू केल्याचे म्हटले जात आहे. महाजनांनी दिलेल्या अब्रुनुक सानीच्या या नोटिशीत नेमकं काय आहे? हे अद्याप समोर आलेलं नाही. मात्र या नोटिशीला आता खडसे यांना कायदेशीर उत्तर द्यावं लागणार आहे.

**एकनाथ खडसे नेमकं काय म्हणाले होते?**


एकनाथ खडसे यांनी काही दिवसांपूर्वी एका पत्रकाराचे नाव घेत महाजन यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप केले होते. खडसे यांचे एका आयएएस महिला अधिकाऱ्याशी संबंध आहेत, असा दावा या पत्रकाराने केलेला आहे, असं खडसे यांनी म्हटलं होतं. तसेच महाजन यांच्या या संबंधाबाबत केंद्रीय मंत्री अमित शाहा यांना कल्पना आहे. मंत्रिमंडळाच्या विस्ता रावेळी शाहांनी महाजनांना बोलवून घेतलं होतं. या बैठकीत दिवसभरातून 100 वेळी तुमचे तिथे कॉल्स झालेले आहेत. हे कॉल डिटेल्स आमच्याकडे आहेत, असे अमित शाह यांनी महाजनांना सांगितले होते," असा दावा त्यांनी केला होता.

**गिरीश महाजन फेटाळले होते आरोप**

एकनाथ खडसे यांच्या दाव्यानंतर गिरीश महाजन यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले होते. हे आरोप सिद्ध झाले तर मी राजकारणातून संन्यास घेईल. कोणालाही तोंड दाखवणार नाही, असे महाजन म्हणाले होते. तसेच भोंदू पत्रकाराच्या हवाल्याने खडसे हे आरोप करत आहेत. मी बोलायला लोगलो तर त्यांना घरातून तोंड काळं करून बाहेर पडावं लागेल. मला बोलायला लावू नका. तुमच्याच घरातील एक गोष्ट सांगितली तर तुमचं बाहेर पडणं अवघड होऊन जाईल, असा इशाराही महाजन यांनी खडसेंना दिला होता.त्यानंतर आता महाजन यांनी खडसेंना कायदेशीररित्या अब्रुनुकसानीची नोटीस पाठवली आहे. या नोटिशीला खडसे काय उत्तरत देणार, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

## सलमानला बॉम्बने उडवून देण्याची धमकी; करुणा शर्मांना वेगळाच संशय, केलं मोठं वक्तव्य

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**




**मुंबई :** अभिनेता सलमान खानला पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे, सलमानची गाडी बॉम्बने उडवून देऊ, सलमानच्या घरात घुसून त्यालाही बॉम्बने उडवू, असं धमकीमध्ये म्हटलं आहे. मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाच्या व्हॉट्स अॅप क्रमांकावर ही धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांच्या तक्रारीनुसार अज्ञात व्यक्तीविरोधात वरळी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरु असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. आता या प्रकरणात करुणा शर्मा यांनी प्रतिक्रिया देताना मोठं वक्तव्य केलं आहे.

**नेमकं काय म्हणाल्या करुणा शर्मा?**

सलमान खान धमकी प्रकरणावर प्रतिक्रिया देताना करुणा शर्मा यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. फक्त सलमान खानलाच का धमक्या मिळत आहेत, अमिताभ बच्चन आणि अक्षय कुमारला धमक्या का येत नाहीत? मला वाटतं येणाऱ्या निवडणुकीत फक्त हिंदू, मुस्लिम आणि ओबीसींशिवाय दुसरा कोणताही मुद्दा त्यांच्याकडे नाही, पण आमचे देवेंद्र फडणवीस साहेब सुरक्षा देण्यास सक्षम आहेत, असं करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे.दरम्यान संतोष देशमुख हत्याकांडातील मास्टरमाईंड असलेल्या वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर आपल्याला देण्यात आली होती, असा खळबळजनक दावा निलंबित पोलीस अधिकारी रंजित कासले यांनी केला आहे. रंजित कासले यांच्या या दाव्यावर देखील करुणा शर्मा यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मिकच्या सुपारीबाबतचा दावा खरा असू शकतो, कारण धनंजय मुंडेंचे सगळे काळे कारनामे वाल्मिक कराडकडे आहेत, त्यामुळे हे होऊ शकतं. पाच कोटी रुपये ही खूप छोटी रक्कम आहे, या लोकांकडे प्रचंड पैसा आहे. अंजलीताई दमानिया तर दररोज नव-नवे खुलासे करत आहेत, मात्र अनेक प्रकरणं पैशांच्या जोरावर दाबले जात आहेत, असा आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे. तसेच सलमान खान धमकी प्रकरणात बोलताना देखील त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे, फक्त सलमान खान यालाच का धमकी आली, इतरांना का धमक्या येत नाहीत? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे.

## "मला एन्काऊंटरची ऑफर होती पण..."; वाल्मिक कराडचं खरंच एन्काऊंटर करण्याचा विचार ? कासलेंच्या दाव्याबद्दल विचारतच अजित पवार म्हणाले...

**सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा**

**मुंबई :** निलंबित पोलीस अधिकारी रंजित कासले यांनी मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती, असा खळबळजनक दावा केला आहे. या दाव्यानंतर महाराष्ट्रात भर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. कासले यांच्या दाव्या नंतर राजकीय वर्तुळातही आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. असे असताना आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**कासले यांनी नेमका काय दावा केला?**

कासले यांनी काही दिवसांपूर्वी एक व्हिडीओ समाजमाध्यमावर शेअर केला होता. या व्हिडीओत त्यांनी मला वाल्मिक कराडच्या एन्का ऊंटरची ऑफर मिळाली होती. त्यासाठी कोट्यवधी रुपयांची ऑफर देण्यात आली होती. मात्र मी ती ऑफर नाकारली. माझ्याकडून असे पाप होणार नाही, असे मी त्यांना सांगितले होते, असा दावा कासले यांनी केला. तसेच एन्काऊंटर करण्यासाठी म्हणाल तेवढी ऑफर दिली जाते. एन्का ऊंटरसाठी 10 करोड, 20 करोड, 50 कोटी रुपये दिले जातात, असा खळबळजनक गौप्यस्फोट त्यांनी केला होता.

**मुंडेंना कराड नको होते- कासले**

याच कासले यांनी आणखी एक व्हिडीओ शेअर करून खळबळजनक दावा केला आहे. धनंजय मुंडे यांनीच वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरसाठी प्रयत्न केले होते, असा मोठा दावा कासले यांनी केला आहे. कराड मुंडे यांचे काही प्रकरणं बाहेर काढणार होते. त्यामुळे मुंडेंना करोड नको होते, असंही त्याने म्हटलंय. त्यामुळे आता या प्रकरणात नेमकं काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

**राऊतांनी केली चौकशीची मागणी**

दरम्यान, उद्धव ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनीही कासले यांच्या विधानाचा हवाला देत राज्य सरकारवर टीका केली होती. कासले यांनी केलेल्या विधानामुळे राज्यात आणि देशात फेक एन्काऊंट रर्स झालेले आहेत, याला पुष्टी मिळाली आहे. त्यामुळे कासले यांच्या विधानाची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी राऊत यांनी केली आहे. त्यामुळे कासलेंच्या दाव्याला चांगलीच हवा मिळाली आहे.

### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

**अजित पवार यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दिली. यावेळी एका निलंबित पोलीस अधिकाऱ्याने मला वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर मिळाली होती, असा दावा केला आहे. यावर तुमचं काय मत आहे? असं एका पत्रकाराने विचारलं. यावर उत्तर देताना, मला याबाबत अधिक काही माहिती नाही. मात्र निलंबित झालेल्या एखाद्या अधिकाऱ्याचे किती मनावर घ्यायचे हे ठरवायला हवे, असे उत्तर अजित पवार यांनी दिले.**



## कविता

### - माझे आवडते औषध -

बऱ्याच जणांचे आवडते चित्रपट, पुस्तक, लेखक, गायक, कलाकार असतात. पण आवडते औषध सुद्धा असू शकते हे ऐकून काहींना आश्चर्य वाटेल. पण माझे आहे आवडते औषध. जगातील कोणताही आजार परवडला पण हा आजार नको, असे वाटायला लावणारी सर्दी / पडसे मला वर्षातून कमीत कमी एकदा आणि काही वेळेस २-३ दा गाठते. पाण्याच्या नळाप्रमाणे वाहणारे नाक, सटासट येणाऱ्या शिंका, डोळ्यातून येणारे पाणी, दुखणारा घसा, अन गिळताना होणारा त्रास, जीव अगदी नकोसा करून सोडतात. बरे, डॉक्टरांकडे जाऊनही काही उपयोग नाही, कारण हा आहे व्हायरल फ्लू आणि याच्यावर कोणतेही औषध नाही. आता काही अँटी-व्हायरल औषधे बाजारात आली आहेत, पण पूर्वी नव्हती. त्यामुळे डॉक्टर काही वेळेस अँटी-बायोटिक्स देत असत, ज्यामुळे हा आजार बरा होत नाही. तर हा व्हायरल फ्लू आठवडाभर ठाण मांडून बसायचा आणि त्यानंतर आपोआप बरा व्हायचा. पण तो आठवडा मात्र खूपच वैताग आणणारा असायचा. सगळे काम-धाम सोडून केवळ नाक पुसत बसावे लागायचे. शिंकांनी जीव बेजार व्हायचा. अशातच मला बेनाड्रिल चा शोध लागला. म्हणजे घरात हे औषध पूर्वीपासून असायचे. पण मला वाटायचे कि ते फक्त घसा दुखल्यावर किंवा कफ असेल तर घेतात. पण गुगल बाबाच्या कृपेने हे समजले की हे औषध 'अँटी-हिस्टामाईन' या प्रकारातील आहे. आणि ते वर सांगितलेली सर्व लक्षणे आटोक्यात ठेवते. मग काय, केली सुरुवात बेनाड्रिल घ्यायला. घेतल्यापासून काही वेळातच सर्व लक्षणे आटोक्यात आली. अगदी जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे. तेंव्हापासून हे औषध माझे आवडते बनले आणि या आजाराची भीती कमी झाली. या औषधाचे काही दुष्परिणाम पण आहेत. मला जाणवलेले दोन आहेत, ते म्हणजे गुंगी येणे आणि बद्धकोष्टता. पण याचे फायदे पाहता, हे तोटे नगण्य आहेत व मला सहन करता येण्याजोगे आहेत. हे औषध पचनाचा वेग मंदावते, म्हणून मग मी आजाराच्या कालावधीत थोडे कमी आणि हलके अन्न खातो. तसेच दुपारी व रात्री झोपण्यापूर्वी हे औषध घेतो. म्हणजे गुंगी पथ्यावरच पडते व झोप लागते. आता 'अँटी-हिस्टामाईन' प्रकारातील काही नवीन औषधे बाजारात आली आहेत, ज्यामुळे गुंगी येत नाही. पण मी ती अजून घेतली नाहीत. हि औषधे टॅब्लेट्स च्या स्वरूपात पण मिळतात, पण जे समाधान चमच्याने बेनाड्रिल पिण्यात आहे ते छोटीशी गोळी खाण्यात नाही. बेनाड्रिल पिल्यावर तोंडात थोडासा चिकटपणा राहतो, तो घालविण्यासाठी मी एखादा घोट पाणी पितो. हा लेखसुद्धा मला बेनाड्रिल घेतल्यामुळेच लिहिणे शक्य झाले. नाहीतर माझ्या हातांची काय बिशाद, नाक पुसायचे सोडून लॅपटॉप वर टंकायची. तर असे हे माझे बेनाड्रीलपुराण.




## - शब्दकोशांच्या मनोरंजक विश्वात -

माध्यमिक शाळेत असताना आम्हाला रोजच्या वेळापत्रकात दोन मधल्या सुट्या असायच्या – एक लहान १५ मिनिटांची तर दुसरी मोठी ४५ मिनिटांची. मोठ्या सुटीमध्ये शाळेच्या ग्रंथालयात आमच्यासाठी वाचनाची सोय केलेली असे. तिथे बसून वाचताना समोरच्या भिंतीवर नजर जाई. तिथे मोठ्या व आकर्षक अक्षरात 'ग्रंथ हेच गुरु' हे वचन लिहिलेले होते. वाचनाच्या आवडीतून त्या वचनाची सत्यता पटत गेली, यात शंकाच नाही. मोठे होता होता मी विविध प्रकारचे तीन भाषांतील साहित्य वाचत गेलो आणि एका निष्कर्षाप्रत येउन ठेपलो. तो म्हणजे, या सर्व ग्रंथरूपी गुरूंचे गुरु म्हणजे शब्दकोश!

सुरवातीला वाचनात एखादा शब्द अडला, की त्याचा अर्थ पाहण्यापुरता शब्दकोश उघडला जाई. तो जमाना अर्थात फक्त छापील पुस्तकांचाच होता. त्या वयात मी शब्दकोशाच्या जाडजूड 'प्रकृती'कडे कुतूहलाने बघत असे. शालेय जीवनात शब्दकोशाचा उपयोग शब्दार्थ पाहण्यापुरताच सीमित होता. तेव्हा इंग्लिश–मराठी, मराठी-इंग्लिश आणि हिंदी-मराठी हे शब्दकोश हाताळले जात. महाविद्यालयीन जीवनात 'ब्रिटीश लायब्ररी' चा सभासद झाल्यावर काही थोर इंग्लिश लेखक वाचायला घेतले. तेव्हा इंग्लिश पुस्तकांचे वाचन म्हणजे एक अभ्यासच असायचा. हातात ते पुस्तक, टेबलावर इं-मराठी शब्दकोश आणि शब्दार्थ टिपून घ्यायला बाजूला वही-पेन. वाचलेल्या साहित्याची काही वडीलधाऱ्यांशी चर्चा होई. त्यात एका गृहस्थांनी सल्ला दिला, की आता शब्दार्थ पाहण्यासाठी तुमच्या शालेय शब्दकोशावर समाधान मानू नकोस; आता गरज आहे ती तू 'Oxford' ची कास धरण्याची.

मग मी Concise Oxford च्या इंग्लिश- इंग्लिश कोशाची खरेदी केली. सहज म्हणून हा कोश चाळू लागलो अन पहिल्या नजरेतच लक्षात आले, की हा निव्वळ शब्दकोश नसून साक्षात ज्ञानकोश आहे. त्यात एखाद्या शब्दाचे अनेक अर्थ देण्यासाठी पुस्तकाच्या पानाचा तब्बल एक स्तंभही खर्ची पडलेला दिसे. एखाद्या कठीण शब्दाचा अर्थ पाहण्यासाठी म्हणून कोश उघडला जाई आणि तो अर्थ पाहता पाहता एकातून दुसऱ्या व त्यातून तिसऱ्या शब्दात मी उड्या मारत असे. कित्येकदा शब्दार्थासाठी उघडलेला कोश पाहताना वाचनाचे मूळ पुस्तक बाजूलाच राही आणि बराच वेळ मी शब्दकोशातच मनसोक्त विहार करीत असे. शब्दाच्या अर्थाबरोबरच त्याचा उगम, ऐतिहासिक संदर्भ इत्यादी माहिती वाचून छान मनोरंजन होई.

बऱ्याचदा आपल्या नेहमीच्या वापरातले शब्दसुद्धा कोशात पाहण्यात मजा येते. उदाहरणार्थ 'August' हा शब्द पाहा. आता हे एका महिन्याचे नाव आहे हे शाळकरी पोरही सांगते. पण ते नाव रोमन साम्राज्याचा पहिला राजा ऑगस्टस सीझर याच्यावरून आहे, तसेच august चा दुसरा अर्थ 'थोर' असाही आहे हे ज्ञान आपल्याला शब्दकोशात डोकावल्याशिवाय कसे मिळेल? एखाद्या शब्दाला तर एकापेक्षा अनेक असे कित्येक अर्थ असतात आणि त्या अर्थांचा एकमेकाशी सुतराम संबंध नसतो. 'set' चे तब्बल १५६ प्रकारचे अर्थ आहेत हे जेव्हा आपल्याला कोशात दिसते तेव्हा मोठा अचंबा वाटतो.

एकच उच्चार पण भिन्न स्पेलिंग व अर्थ असणारे शब्द जेव्हा आपण कोशात पाहून पक्के करून घेतो तेव्हा होणारा आनंद काही वेगळाच असतो. सध्याच्या ' हॅलो, हाय'च्या युगात बहुतेकांना फोनवरचाच 'हॅलो' माहित असतो. पण, शब्दकोश बारकाईने पाहणाऱ्यालाच hallo, hallow & halo यांतील फरक समजलेले असतील. आपल्या देशात गेल्या पंचवीस वर्षांत इंग्लिश माध्यमातून शालेय शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय दिसून येते. ही पिढी 'स्पोकन इंग्लिश' च्या बळावर येताजाता टूरटूर करीत असते. पण त्याचबरोबर त्यांचे स्पेलिंग व व्याकरण यांकडे कमालीचे दुर्लक्ष झालेले जाणवते. अशा काहींची फिरकी घ्यायला मला आवडते. त्यांना मी 'फुलस्केप' या परिचित शब्दाचे स्पेलिंग विचारतो.




आतापर्यंत तरी मला हे अचूक स्पेलिंग सांगणारी व्यक्ती भेटलेली नाही. याचे स्पेलिंग आहे 'foolscap' आणि योग्य उच्चार आहे 'फुल्झकॅप'. हे ज्ञान शब्दकोशाला आपला मित्र केल्याशिवाय प्राप्त होणे नाही! मोठ्या आकाराचा कागद म्हटल्यावर बहुतेकजण 'full...'अशी सुरवात करतात अन fool होऊन बसतात! या शब्दाचा उगम तर किती मनोरंजक. Fool म्हणजे विदूषक. पुरातनकाळी विदूषक जी टोपी वापरत त्या टोपीचे चिन्ह 'watermark' म्हणून या कागदात उमटवलेले असे.

'फुलस्केप' वरून घडलेला एक किस्सा सांगतो. एका माध्यमिक शाळेत सत्राच्या पहिल्या दिवशी एक शिक्षिका विद्यार्थ्यांना म्हणाल्या, "हे बघा, सर्वांनी 'फुलस्केप' वह्या आणायच्या आहेत, 'हाफस्केप' वह्या आणलेल्या मला अजिबात चालणार नाहीत!" एखादा शब्द नीट न शिकून घेतल्याचे परिणाम एका पिढीकडून पुढच्यांकडे कसे संक्रमित होतात याचे हे उदाहरण.

गडद काचांच्या चष्म्याला आपण 'गॉगल' म्हणतो यात नवीन काहीच नाही. पण या शब्दाचे स्पेलिंग goggles असून ते अनेकवचनी नाम म्हणूनच वापरायचे असते ही दृष्टी मला शब्दकोशानेच दिली. आपल्या समाजात एखाद्याने 'लेस्बिअन' हा शब्द जरी उच्चारला तर आपण पटकन चमकून त्याच्याकडे पाहतो. जर उत्सुकता म्हणून आपण हा शब्द कोशात पाहिला तर त्याचा उगम पाहून आपली करमणूक होते. 'lesbos' नावाच्या बेटावर 'साफो' नावाची कवयित्री राहत असे आणि ती समलिंगी संबंधात गुंतल्याचा लोकांना संशय होता. ही माहिती समजल्यावर या शब्दाकडे आपण अश्लील म्हणून न पाहता कुतूहलाने पाहू लागतो.

आजकाल आपले एखादे कार्यालयीन काम होणे जर एखाद्या स्त्रीच्या हातात असेल तर तिच्या तेथील दर्जाचा विचार न करता आपण तिच्यापुढे सारखे 'Madam, Madam' करीत असतो. आता 'madam' चे कोशातील दोन अर्थ बघा. या शब्दाचा उगम फ्रेंचमधून आहे.त्याचा पहिला अर्थ 'बाईसाहेब' असा तर दुसरा चक्क 'वेश्यागृहाची मालकीण' असा आहे! तसेच या शब्दाचे अनेकवचन( madams असे नसून) फ्रेंच पद्धतीने Mesdames असे आहे. सध्या सर्वत्र बोकाळलेल्या मॅडमांनी हा शब्द पूर्णपणे समजून घ्यायला काही हरकत नाही.

वैद्यकीय अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यापासून ते डॉक्टर होऊन तीस वर्षे उलटून गेल्यावरही वैद्यकीय शब्दकोश हा तर माझा जिवलग मित्र आहे. त्याच्या पातळ पांढऱ्याशुभ्र कागदावर परदेशात केलेली सुंदर छपाई, त्याचा लठ्ठ पण मोहक आकार, त्यातील अवघड शब्दांची केलेली सुरेख फोड, शब्दार्थांचा पाडलेला कीस आणि शब्दानुरूप चित्रे ही त्याची वैशिष्ट्ये मला नेहमीच मोहित करतात. सामान्य वाचकांसाठी त्यातले दोन मनोरंजक शब्द सांगतो:

१. AC/DC : खरे तर आपल्या सामान्यज्ञानानुसार हे विद्युत प्रवाहाचे दोन प्रकार आहेत. पण वैद्यकीय कोशातील त्याचा अर्थ 'bisexual individual' असा वाचल्यावर आपण कपाळावर हात मारून घेतो!

२. Hartnup disease : हा एक आनुवंशिक आजार आहे. आता Hartnup हे बहुधा ज्या शास्त्रज्ञाने तो आजार शोधला त्याचे नाव असेल असा अंदाज आपण बांधतो. पण शब्दकोशाचा पाहा काय सांगतो ते. Hartnup हा शास्त्रज्ञ नसून, तो आजार ज्या रुग्णामध्ये पहिल्यांदा आढळला त्याचे आडनाव आहे. १९५० च्या सुमारास ब्रिटनमधील श्री. हार्टनप यांनी आपल्या cousinशी लग्न केले होते. त्या दाम्पत्याला झालेल्या आठ अपत्यांपैकी चौघांमध्ये हा आजार आढळून आला.


मराठी-मराठी कोश हाताळणे ही सुद्धा एक चांगली करमणूक आहे. अर्थात इंग्लिश-इंग्लिशच्या तुलनेत या कोशाचे स्वरूप त्रोटक वाटते, हे कबूल करावे लागेल. बऱ्याचदा मराठी कोश बघण्याच्या बाबतीत मराठी माणूस उदासीन असतो. आपल्या दैनंदिन वापरातील काही मराठी शब्दांचा खरा अर्थ हा कोश पाहिल्यावरच आपल्याला समजतो. अन्यथा त्याऐवजी काहीतरी चुकीची कल्पना किंवा अर्धवट माहिती आपल्या डोक्यात असते. एकदा एका कॉलेजच्या तरुणाला मी 'आदिवासी' चा अर्थ विचारला. क्षणाचाही विलंब न लावता तो म्हणाला, "ते म्हणजे अति मागास गरीब लोक". त्याच्या म्हणण्यात जरी तथ्य असले तरी खरा अर्थ तो नाही. 'आदी'= मूळ व 'वासी'= राहणारे. म्हणजेच, एखाद्या प्रदेशातील मूळ रहिवासी.

आपल्याकडे पाटील, कुलकर्णी, कांबळे ही अगदी सर्रास आढळणारी आडनावे. एकदा सहज म्हणून 'कुलकर्णी' ची व्युत्पत्ती कोशात बघितली आणि स्तिमित झालो. ती बघण्यापूर्वी, 'कुलकर्णी' हा शब्द अस्सल मराठीच – एवढेच काय, पण पक्का पुणेरीच- या भ्रमात मी होतो. शब्दकोशाने मला सांगितले, की हा शब्द मूळ तेलुगु (कुळकरणी) आहे. कुळ = शेतकरी आणि करण = हिशेब. हे वाचल्यावर मला एका 'कुळाचा' शोध तर लागलाच आणि त्याचबरोबर माझ्या भाषिक अस्मितेचे कुंपण गळून पडले, हे नक्की!

शब्दकोशांमध्ये काही व्यवहारोपयोगी परिशिष्टेही असतात. निरनिराळ्या लघुरुपांचे (acronyms) पूर्ण रूप देणारे परिशिष्ट हे त्यातले एक ठळक उदाहरण. सध्याच्या संगणकीय युगात कित्येक नवीन लघुरुपांचा सुळसुळाट झालेला आहे. अशी काही लघुरूपे आपल्या डोळ्यांसमोर सतत आल्याने हळूहळू आपल्याला ते जणू काही शब्दच आहेत असे वाटू लागते. एक उदाहरण देतो. सध्या कोणताही online व्यवहार करताना आपल्याला सतत भेटणारे एक लघुरूप म्हणजे 'CAPTCHA'. त्याचे दीर्घरूप किती मनोरंजक आहे आणि त्यामागचा तांत्रिक इतिहास काय आहे, ते आपल्याला कोश पाहिल्याशिवाय कळणे नाही!

आपले ज्ञान समृद्ध करतानाच आपल्यावर मनोरंजनाचाही शिडकावा करणारे विविध शब्दकोश आपल्या वापरात जरूर असावेत. माझ्याकडे विविध प्रकारचे सुमारे डझनभर कोश आहेत. आंतरजालाच्या व्यापक प्रसारानंतर आता अनेक प्रकारचे कोश जालावर उपलब्ध आहेत. त्यामुळे जाडजूड वजनाचे छापील कोश आता एखाद्याच्या वैयक्तिक ग्रंथसंग्रहात कमी दिसतात. पण, माझी पिढी ही मुळात अशा छापील कोशांवर 'पोसली' गेली असल्याने माझ्याकडे ते आजही आहेत. माझे त्यांच्यावर इतके प्रेम आहे की मी त्यांना माझे कुटुंबघटकच मानतो! माझ्या घरभर ते विखुरलेले आहेत. त्यापैके एक-दोघांनी तर माझ्या पलंगावर विसावण्याचा मान पटकावलाय. वेळप्रसंगी माझ्या एकटेपणात ते माझी सुरेख सोबत करतात. धष्टपुष्ट छापील कोशाला प्रेमाने उराशी कवटाळण्याची मजा काही औरच असते. त्याची सर जालकोशाच्या 'सर्च इंजिन'ला कशी येईल?

एखादे दिवशी जर हाताशी वाचण्यासारखे काही नसेल तर मी खुशाल एखादा कोश हाती घेऊन त्यात डोके खुपसून बसतो. दिवसाकाठी निदान एकतरी नवीन शब्द मी कोशांमधून शिकतो व समजावून घेतो. ग्रंथाचे गुरु असलेल्या शब्दकोशांनी मला ज्ञान आणि मनोरंजन या दोन्ही पातळ्यांवर अतीव समाधान दिलेले असल्याने मी त्यांचा कायमचा ऋणी आहे.













दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

## विशेष बातमी

### गोळेगाव बुद्रुक येथे महामानवास वंदन

सेवाशक्ती टाईम्स.
देवचंद्र समदूर.





शेगाव : शेगाव तालुक्यात अंतर्गत येत असलेल्या ग्राम गोळेगाव बुद्रुक येथे आज दिनांक 14 एप्रिल 2025 रोजी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत गोळेगाव बुद्रुक जिल्हा परिषद शाळा गोळेगाव बुद्रुक तक्षशिला बुद्ध विहार गोळेगाव बुद्रुक या ठिकाणी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्प धूप दीपा ने पूजन करून त्यांना त्रिवार वंदन करण्यात आले यावेळी गावचे सरपंच संतोष नांदो कार शाळेचे शिक्षक डाबेराव सर माजी सरपंच रघुनाथ मापारी उपसरपंच पती शांताराम गावंडे सदस्य देवचंद्र समदूर सदस्य पती निलेश गावंडे संतोष सुलतान संदीप गावंडे ग्रामपंचायत परिचारक उमेश नांदो कार शाळेतील विद्यार्थी व आदी गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# शॉर्ट सर्किट मुळे आखाड्याला लागली भीषण आग

## संसार उपयोगी साहित्यासह शेती उपयोगी साहित्य जळून खाक

सेवाशक्ती टाईम्स.
भागवत चव्हाण.









जिंतूर : तालुक्यातील सावरगाव तांडा येथील शेतकरी जनार्दन दिपला पवार यांच्या सावरगाव येथील गट क्रमांक १३७ मधील राहत्या शेत आखाड्यावर दि .१५ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी ११ : ४५ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमध्ये भीषण आग लागली. तालुक्यातील सावर गाव तांडा येथे पंधरा पंधरा दिवसातील ही दुसरी घटना असून येथील जनार्दन दिपला पवार त्यांच्या राहत्या शेत आखाड्यावर भीषण आग लागून संसार उपयोगी साहित्यसह शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. दरम्यान या आगी मध्ये शेती उपयोगी पिककलरचा सट, नुकताच शेतातून गहू काढून आखाड्यावर ठेवलेल्या तीन बॅग, ज्वारी, नुकतेच सोयाबीन विकून मिळालेल्या ६० हजारातून उरलेले ३५ हजार रोख रक्कम, फवारा, टीव्ही, यासह सर्व वस्तू खाक झाले आहे. जनार्दन पवार व त्यांच्या पत्नी यांच्या अंगावर परिधान केलेले कपडे मात्र शिल्लक आहे. या लागलेल्या भीषण आगीत आग विझवण्या साठी धडपड करणाऱ्या जनार्दन पवार व त्यांच्या पत्नी यांना आगीचे चटके लागून जखमी झाली आहे. शासन दरबारी आर्थिक मदत मिळण्याचे आवाहन जनार्दन पवार यांनी एका निवेदना द्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

## महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त

### आदर्श शिक्षक विश्वनाथ घोडके यांचा सत्कार

सेवाशक्ती टाईम्स.
अहेमद अन्सारी.



पाथरी परभणी : दिनांक 14 एप्रिल 2025 सोमवार रोजी महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आज जयंती निमित्त पोलिस मित्र समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला पोलिस मित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय अशोक एल गवांदे यांच्या मार्गदर्शनाखली आज पोलिस मित्र समितीचे तालुका अध्यक्ष पत्रकार आणि समाज सेवक महेश जोशी सर यांनी आदर्श शिक्षक विश्वनाथ घोडके यांचा सत्कार केला घोडके सर हे गेल्या अनेक वर्षांपासून शाळेवर काम करतात त्यांनी आजपर्यंत अनेक विद्यार्थी घडवले आहेत म्हणून पोलिस मित्र समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला हा सत्कार करताना मला मनापासून आनंद झाला

## महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला

### वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

सेवाशक्ती टाईम्स.
भारत चव्हाण.



सारकिन्ही : महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना र. नं. 38 81 यांच्या वतीने डॉ. बाबा साहेब आंबेडकर जयंती अशोक वाटिका अकोला येथे साजरी करण्यात आली. अध्यक्ष संगीता ताई जाधव जिल्हा उपाध्यक्ष विष्णू लाड,, जिल्हा सरचिटणीस संजय डाबेराव, जिल्हा कोषाध्यक्ष मंगलाताई तीतूर, जिल्हा कार्याध्यक्ष शुभांगी ताई बारबदे, जिल्हा सचिव रामरतन मेटांगे, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख रितेश वानखडे, जिल्हा सल्लागार वृंदा विजयकर, जिल्हा उपाध्यक्ष रुपाली तूपोने, जिल्हा सल्लागार आसरा ताई भगत, जिल्हा मार्गदर्शक, क्षमाताई बाविस्कर, बाळापूर तालुका अध्यक्ष प्रियांका अंभोरे, जिल्हा सहसचिव राजेंद्र नागरे, अमोल गुल्हाने, जयवंत मालोकार राजेश मनुवले अविनाश बेलोकार, धम्मपाल खंडारे ,विठ्ठलराव हिवराळे ,बाळू वाकोडे, पांडुरंग तेलगोटे ,सुनीता चव्हाण, मंगला हाडोळे, ललिता महल्ले ,प्रज्ञा तायडे, सागर देशमुख, प्रशांत गुल्हाने, रत्नमाला कानकिर, सलोनी पोटे रवि राठोड ,अनिता इंगळे, स्नेहल इंगळे ,वर्षा मेश्राम उपस्थित होते

# नाचुन मोठे होऊ नका, वाचून मोठे व्हा! गजानन हरणे यांचे जयंती उत्सवात प्रतिपादन

सेवाशक्ती टाईम्स.
वृत्त संकलन.



अकोला : "माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा माझे अपूर्ण राहिलेले कार्य प्राणपणाने पूर्ण करा. जर तुमच्याकडे दोन नाणी असतील, तर एका नाण्याची भाकर घ्या आणि दुसऱ्या नाण्याचे पुस्तक घ्या. भाकर तुम्हाला जगवेल, तर पुस्तक तुम्हाला जगण्याची कला शिकवेल!" विश्वरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांचे हे प्रेरणादायी विचार आजही तितकेच समर्पक वाटतात आणि हेच विचार कृतीत उतरविण्याचे आवाहन समाज सेवक गजानन हरणे यांनी केले. अकोला तहसील परिसरात आयोजित सर्वधर्मीय महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर जयंती महोत्सव कार्य क्रमात समाजसेवक गजानन हरणे बोलत होते. "महा मानवाचा एकच आदेश नाचून मोठे होऊ नका, वाचून मोठे व्हा" याचा आजच्या पिढीने विशेषतः तरुणांनी अंतर्मनातून स्वीकार केला पाहिजे, असे सांगत त्यांनी शिक्षणाचे महत्व आणि सामाजिक परिवर्तना साठी ज्ञानाची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे आयोजन सर्वधर्मीय महामानव जयंती उत्सव समिती, तहसील परिसर, गांधी रोड, अकोला यांच्या वतीने करण्यात आले होते. १४ एप्रिल २०२५ रोजी तहसील आवाराच्या ग्राऊंड फ्लोअरवर पार पडलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. साहेबराव इंगळे (गुरुजी) यांनी भूषवले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शरद जावळे ,(उप विभागीय अधिकारी अकोला), गजानन हरणे (समाज सेवक), उषाताई विरक (मनपा नगर सेविका), दिपाली जानोरकर , अॅड. छगनराव खंडारे (नोटरी), दीपक बोरकर,विजय राजपूत, गोपाल अग्रवाल, शितल गिरी, सरोज राजगुरु, वसुंधरा नंद गवळी, गौतम कंकाळ,आणि मा. अॅड. प्रमोद एन. रौराळे (नोटरी) अमित सर या मान्यवरांची उपस्थिती लाभली सदर कार्यक्रमात गजानन हरणे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, "आजच्या तरुण पिढीने बाबा साहेबांचे विचार केवळ घोषणांपुरते किंवा पोस्टरपुरते मर्यादित न ठेवता, त्यांच्या विचारांची कृतीमूल्ये अंगी कारली पाहिजेत. शिक्षण हा समाज परिवर्तनाचा खरा मूलमंत्र आहे. म्हणूनच आपण प्रत्येकाने वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे. बाबासाहेबांनी संपूर्ण जीवन संघर्षातून ज्ञान मिळवले आणि शोषित, वंचित, दुर्बल वर्गासाठी संविधानाची उभारणी केली. त्यांचा हा संघर्ष आपण विसरु नये."कार्यक्रमाचे आयोजन देवानंद अंभोरे, अनिल वाकडे, गोपाल चौधरी, रवि विसपुते, नंदलाल सावळे, कैलास भालेराव, केवल मेश्राम, धीरज ठाकुर, संदीप सिरसाठ रहमान खान,यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आले होते. या सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मनापासून परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मीयांचा सहभाग. महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित नसून सर्वसमावेशक आहे. त्यांचा संदेश म्हणजे समानता, बंधुता, शिक्षण आणि समतेच्या मूल्यांवर आधारलेले जीवन. कार्य क्रमात उपस्थित नागरिकांनी त्यांची शिकवण आणि विचार आत्मसात करण्याचा निर्धार केला. कार्य क्रमात वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आणि त्यागाचा उल्लेख करत सांगितले की, स्त्रीशिक्षण, शेतकऱ्यांचे हक्क, जातीभेद विरोधी आंदोलन, आणि सामाजिक समतेसाठी महात्मा फुले यांनी केलेले कार्य आजच्या काळातही अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या पाठो पाठ बाबा साहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय,आर्थिक समता आणि राजकीय हक्कां साठी जो संघर्ष केला तो जगातील सर्वात महान परिवर्तनां पैकी एक आहे. कार्य क्रमाच्या सुरुवातीस महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. यानंतर उपस्थित विविध मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा संपूर्ण परिसर सामाजिक समतेच्या घोषणांनी दुमदुमून गेला होता.कार्यक्रमाचे संचालन अतिशय प्रभावी पद्धतीने देवानंद अंभोरे यांनी पार पाडले आणि शेवटी आभार प्रदर्शन अनिल बाकडे यांनी केलं. परिसरातील नागरिक, विद्यार्थी, महिला आणि तरुणवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आजच्या धकाधकीच्या जीवनात, शिक्षण आणि सामाजिक जागरुकतेचा संदेश देणारा असा कार्यक्रम समाजमनात नवी उमेद निर्माण करणारा ठरतो. 'वाचन हा खरा आत्मा जागवण्याचा मार्ग आहे', हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वाक्य आजही तेवढेच सत्य आहे. त्यांच्या जयंती निमित्त त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत उतरवणे हीच खरी मानवंदना आहे. समारोपियया कार्य क्रमाच्या माध्यमातून 'महान व्यक्तींच्या कार्याचा गौरव केवळ जयंती साजरी करून न करता, त्यांच्या विचारांचे आचरण करण्याद्वारे करावा,' हा संदेश सर्व उपस्थितांच्या मनात ठसला. अशा कार्य क्रमांतून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्या साठी आवश्यक असलेल्या विचारांची पेरणी होत असते. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या विचारांची मशाल पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य हीच खरी समाजसेवा आहे असे समाजसेवक गजानन हरणे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# पातुरातील केजीएन शाळेच्या शिक्षकाची मुख्यमंत्र्याकडे तक्रार

## अल्पसंख्यांक संस्थांची एसआयटी मार्फत चौकशी करा

सेवाशक्ती टाईम्स.
संदीप राठोड.



खामगांव : पातूर येथील सय्यद कामरोद्दीन सय्यद इस्माईल यांच्या महात्मा गांधी एजुकेशन सोसायटी ,शाहबाबू क्रीडा मंडळ ,ग्रामीण शिक्षण मंडळ ,या तिन्ही संस्थांची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी शिक्षिका नुजहत फरहीन शेख कय्युम यांनी १३ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फ़डणवीस यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. शिक्षिका नुजहत फरहीन शेख कय्युम हि पातूर येथील केजीएन उर्दू शाळेवर कार्यरत असताना, आर्थिक व्यवहारा मुळे तिला संस्था सचिव सय्यद कामरोद्दीन यांनी २०२३ वर्षी निलंबित केले होते.निलंबित झालेल्या शिक्षिकेसह इतर शिक्षकांनी शाळेचे सचिव यांच्याकडून आर्थिक व्यवहार ,शरीर सुखाची मागणी ,जीवे मारण्याची धमकी ,आदी बाबतच्या तक्रारी अल्प संख्यांक अयोग्य प्यारे खान यांच्याकडे करण्यात आल्या होत्या, सदर तक्रारीची दखल घेत प्यारे खान यांनी दोन महिन्यापूर्वी सय्यद कामरोद्दीन यांच्या पातुरातील केजीएन, सलीम जकारिया, गफ्फारीया, या तिन्ही उर्दू अल्प संख्याक शाळेत भेट दिली असता, एकाच जागे मध्ये दोन वेगवेगळ्या नावाने शाळा सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. त्याच वेळे संबंधित अधिकाऱ्यांना कार वाई करण्याचे आदेश अल्पसंख्यांक अयोग्य प्यारे खान यांनी दिले होते.परंतु संबंधित अधिकाऱ्या कडून अद्यापही कारवाई करण्यात आली नाही,कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने तिन्ही अल्पसंख्यांक संस्थांची एसआयटी मार्फत चौकशी करण्यासाठी शिक्षिका नुजहत फरहीन यांनी मुख्य मंत्र्यांकडे धाव घेऊन चौकशीची मागणी केली आहे.

### अल्पसंख्याक अयोग्य आक्रमक : कारवाईला सुरुवात

**संस्था सचिव सय्यद कामरोद्दीन यांच्या तीन शाळेवर अल्पसंख्याक अयोग्य प्यारे खान यांनी दिलेल्या भेटी दरम्यान अनेक धक्कादायक खुलासे समोर आल्याने त्यांनी कारवाईसाठी आक्रमक भूमिका घेऊन प्रकरण उघडकीस आणले, आणि त्यांच्या शिफारशीवरून मुख्यमंत्र्यानी दखल घेत अल्पसंख्याक संस्थांमधील अनियमितताची चौकशी करण्याचे आदेश संबंधित शिक्षण विभागाला दिले आहे.**

## विशेष बातमी

### आलियाबाद ग्रामपंचायत कार्यालयात घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
अजित चव्हाण.



**जळकोट :** तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथे ग्रामपंचायत कार्यालयात घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सभापती तथा जिल्हा परिषदेचे सदस्य प्रकाश चव्हाण, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण, सेवा निवृत्त विस्तार अधिकारी डॉ.यशवंत चव्हाण, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विनायक चव्हाण, शिवाजी पोलीस पाटील, हरीदास राठोड, शिवाजी चव्हाण, मोतीराम राठोड, संतोष राठोड, संजय राठोड, सुभाष चव्हाण, संदीप राठोड, बाबु जाधव , मनोज पवार यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेच्या जिल्हा अध्यक्ष पदी संतोष राठोड यांची निवड

**सेवाशक्ती टाईम्स.**
भागवत चव्हाण.



**जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यातील कुऱ्हाडी तांड्याचे युवा सरपंच व उद्योजक बंजारा समाजाचे निडर निर्भीड नेतृत्व करणारे खंबीर व्यक्तिमत्व राजकारणातील चाणाक्ष बुद्धिमत्ता अशी ओळख असणारे संतोष राठोड यांची नवनिर्माण बंजारा क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष किरण चव्हाण व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुकेश राठोड, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रमेश चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष सचिन राठोड, महिला प्रदेशाध्यक्ष आशाताई राठोड, मराठवाडा अध्यक्ष रामभाऊ राठोड यांच्या नेतृत्वामध्ये यांची निवड परभणी जिल्हाध्यक्षपदी करण्यात आली आहे. संतोष राठोड यांना पुढील वाटचाली व समाजकार्यासाठी सातत्याने लढा देऊन बंजारा समाजाचे अनेक विकसित मागण्यासाठी लढा देऊन समाज पुढे आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्त्रातून निवडीचे कौतुक होत आहे.

### कु-हा येथे शॉर्ट सर्किटने गोठ्याला आग लागुन सहा लाखांचे नुकसान ट्रॅक्टरसह,शेती उपयोगी साहित्याचे नुकसान

**सेवाशक्ती टाईम्स.**
वृत्त संकलन.

**रिसोड :** तालुक्यातील कु–हा येथील युवा शेतकरी गजानन माणिकराव नागरे यांचे गट क्र.२२१२ मधील यांच्या शेतातील नुकसानाचा पंचा समक्ष पंचनामा शा◌ॅटसर्कीटने गोठ्याला आग लागुन शेतातील शेती उपयोगी साहीत्याचे सुमारे दोन लाखांचे नुकसान झाल्याचा पंचनामा पंचा समक्ष पंचनामा करण्यात आला. गजानन माणिक राव नागरे यांच्या नावे मौजे कु–हा येथे गट. क्रमांक २२१२मध्ये ४.७० हे. आर ऐवढी जमीन असुन त्यांनी हळदीचे पिक घेतले आहे. दि.१२ एप्रिल रोजी अंदाजे २ वाजला शॉंट सर्किट मुळे आग लागुन जलसिंचनासाठी वापरले जाणार सहित्या ठिबक सिंचन ८५ बन्डल,पीव्हीसी पाईप १०० नग असे अंदाजे ५९०,०००/- रोवढ्या रुपयांचे नुकसान झाले आहे.या घटनेचा पंचनामा गावातील पंचासमक्ष ग्राम महसुल अधिकारी पि.पी.राठोड यांनी केला आहे.

## मेहकर पंचायत समिती अंतर्गत आधारकार्ड दुरुस्ती करणे व नवीन आधार कार्ड काढण्याच्या कॅम्पचे आयोजन









**सेवाशक्ती टाईम्स.**
कृष्णा हावरे.

**बुलढाणा :** आधारकार्ड दुरुस्ती व नवीन आधार काढण्याच्या कॅम्पचे आयोजन कॅम्प पंचायत समिती मेहकर केंद्र -जानेफळ स्थळ - श्री सरस्वती प्राथमिक शाळा जानेफळ या ठिकाणी दिनांक 15 /4/25 ते 16/4/25 वेळ :- सकाळी 10:30 ते 5:00 वाजे पर्यंत या वेळेत करण्यात आले असूनआधार कार्ड कॅम्प श्री. सरस्वती प्राथमिक शाळा जानेफळ येथे सुरु आहे.जानेफळ केंद्रातील सर्व शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या शाळेतील ज्या विध्यार्थी कडे आधार कार्ड काढलेले नाहीत, आधार कार्ड अपडेटेशन, आधार कार्ड मध्ये दुरुस्ती करणे सुरु आहे. तरी पालक, विध्यार्थी यांना ग्रामपंचायत ऑनलाईन नोंदणी केलेला जन्म प्रमाणपत्र सोबत नेवून विध्यार्थी यांनी श्री. सरस्वती प्राथमिक शाळा जानेफळ येथे आधार कार्ड काढून घ्यावे असे आवाहन केंद्रप्रमुख किसन बापू देशमुख यांनी केले आहे.

## विभागीय आयुक्त गावंडे साधणार मंठा तालुक्यातील गरजू नागरिकांची ऑनलाइन वेबिनाद्वारे संवाद - सोनाली जोंधळे

**सेवाशक्ती टाईम्स.**
शुध्दोधन खंदारे.

**मंठा :** 16 एप्रिल बुधवार रोजी दुपारी 4 वाजता, शिव रस्ते, पाणंद रस्ते याबाबत संवाद. मंठा तालुक्यातील गरजू नागरिकांनी व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी केली आहे. व दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की मंठा तालुक्यातील गरजू नागरिक आपल्या शेतातील जाण्या–येण्याच्या रस्त्यां बाबत अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशास कीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी जातात. मात्र विभागीय पातळी वरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील या नाविण्यपूर्ण उपक्रमाचा प्रारंभ येत्या 16 एप्रिल 2025 रोजी दुपारो 4 वाजता होणार आहे.जे रस्ते अस्तित्वात आहेत त्यांना क्रमांक देण्यात यावेत. शेतजमिनी मध्ये बहिवार करण्या साठी अस्तित्वात असलेले रस्ते काही ठिकाणी अरुंद आहेत. अशा ठिकाणी मोठी वाहने जाण्यास अडचण निर्माण होऊन तक्रारही होतात. राज्यातील सर्वच शिवपाणंद आणि शेतरस्त्यांचों हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करावी, शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासना मार्फत योग्य ती कार्यवाही करावी, शेत वहिवाट रस्त्याची तक्रार सुनावणी तहसील दार यांच्याकडे होते, अशी रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत. असे स्पष्ट आदेश मा. ना. श्री. चंद्रशेखर बावण कुळे, मंत्री महसूल (महाराष्ट्र राज्य) यांनी दिले आहेत.त्या अनुषंगाने गरजू शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांचे निराकरण करणेसाठी विभागातील सर्व निवासी उप जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांच्या उपस्थितीत सर्व गरजू शेतकऱ्यांशी या वेबिनार च्या माध्यमातून चर्चा आणि अडचणीचे निराकरण करण्यात येणार आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिदध करण्यात येत आहे. गरजू नागरिकांना आपल्या मोचाईल व्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. तरी मंठा तालुक्यातील गरजू नागरिकांनी व सर्व शेतकऱ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार जोंधळे यांनी केले आहे.

## जिंतूर येथे भिमजायंती निमित्त ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे यांच्या किर्तनाचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
भागवत चव्हाण.

**जिंतूर :** विश्वभूषण डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त प्रतिवर्षी जिंतूर शहरात साजरा होणाऱ्या उलगुलान महोत्सव निमित्त राष्ट्रीय कीर्तनकार ज्ञानेश्वर माऊली महाराज वाबळे आळंदीकर यांच्या समाज प्रबोधनपर कीर्तनाचा कार्यक्रम दि १७ एप्रिल गुरुवार रोजी सायंकाळी ६:०० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर प्रांगण, नगर परिषद जिंतूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्य क्रमाचे स्वागता ध्यक्ष अँड. चंद्रकांत बहिरट कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. देवराव कऱ्हाळे उद्घाटक राहुल शेठ देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला जिंतूर तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि सामाजिक



चळवळीतले प्रमुख व्यक्तिमत्व यांचा सत्कार करण्यात येणार असून जिल्हाभरातून सामाजिक चळवळीतले कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्ताने परभणी जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय कीर्तनकार यांच्या सामाजिक कीर्तनाचा प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आल्यामुळे अनेकांना या कार्यक्रमाची उत्सुकता आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक पत्रकार रत्नदीप शेजावळे, भगीरथ मिरासे, आकाश तारे, अशोक प्रधान, प्रवीण वाकळे, भास्कर सुरवसे शंकर वाघ, सुखदेव वाहुळे नामदेव तूपसुंदर यांनी केले आहे.

> **- "भिमजयंती सणाला.. माऊली किर्तनाला" -**
>
> परभणी जिल्ह्याच्या आंबेडकरी गायन संस्कृतीच्या ईतिहासात भिमजयंती निमित्त प्रतिवर्षी आयोजीत करण्यात येणाऱ्या सांस्कृतीक कार्यक्रमाला भिमगीत, ऑर्केस्ट्रा, गायन सामना अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते परंतु या वर्षी मात्र जिंतूर मधील उलगुलान भिमोत्सव निमित्त वारकरी संप्रदायातील एका किर्तनकाराला आमंत्रित करण्याची बहुदा ही पहिलीच वेळ असल्याने माऊली महाराज वाबळे किर्तनातून नेमका कोणता संदेश देतील याची उत्सुकता वाढली आहे.

## शिक्षक सेना परिवाराच्या वतीने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
वृत्त संकलन.

**लोणार :** १४ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना परिवाराच्या वतीने घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती गटसाधन केंद्र या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्य क्रमाचे अध्यक्ष म्हणून नव नियुक्त गटशिक्षणा धिकारी कुंभारे यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणुन शिवाजी डोंगरदिवे सर,संतोष आनंदा मुंढे सर,संतोष आढाव सर, गजानन तुरुकमाने सर, शिक्षक सेना तालुकाध्यक्ष रामप्रसाद कायंदे



सर हे उपस्थितीत होते. या प्रसंगी शिवाजी डोंगरदिवे सर, शिवाजी मुसळे सर,गजानन तुरुकमाने सर यांनी महामानव डॉ. बाबा साहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून बाबा साहेबांचे जीवनकार्य आपल्या सर्वां साठी प्रेरणा दायी असल्याचे सांगितले. आजच्या प्रसंगी जि. प. शाळा देऊळगाव कुंडपाळचे आदर्श व उप क्रमशिल शिक्षक राम कांगणे सर यांना वाढ दिवसाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक सेनेचे पदाधिकारी संतोष बळीराम मुंढे सर, संदीप दूधमोगरे सर, सरदार शहा सर,दिनकर दराडे सर, राम कांगणे सर,साळुंखे सर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन जिल्हासचिव दीपक चव्हाण सर यांनी केले. तर आभार प्रदर्शन तालुका कार्याध्यक्ष श्री नागेश वारे सर यांनी केले.

## जय भीमच्या गजरात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मिरवणूक, महिलांचा उत्साह

**सेवाशक्ती टाईम्स.**
समाधान सरकटे.

**साखरखेर्डा :** साखरखेर्डा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात आली . जय भीमच्या गजरात साखरखेर्डा नगरी दुमदुमली होती . दुपारी दोन वाजता भीम नगरातून भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मिरवणूक निघाली असताना संताजी जगनाडे महाराज नगर, गुजरी चौक, गणपती चौक, खालचे बसस्थानक, महात्मा ज्योतिबा फुले नगर, अहिल्याबाई होळकर नगर मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरात मिरव णूकीचा समारोप झाला. या मिरवणुकीत भारतरत्न डॉ बाबा साहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांचे अर्धाकृती पुतळे सजविलेल्या रथात आरुढ होते. ग्राम पंचायतीचे वतीने माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष राम जाधव, उपसरपंच सय्यद रफीक, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य रावसाहेब देशपांडे, अमित जाधव, अशोक इंगळे, महेंद्र पाटील यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तर माजी सरपंच दाऊद कुरेशी यांनी पुष्परुष्टी करुन अभिवादन केले. मिरवणुकीत माजी उपसरपंच रामदास सिंग राजपूत , शुभम राजपूत यासह अनेक समाज बांधवांनी सहभाग घेतला होता.

**आपण संविधानाचे सेवक आहोत --- आमदार मनोज कायंदे यांचे प्रतिपादन**





मतदारांनी आप ल्याला निवडून दिले असले तरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामूळे आपण आमदार झालो असलो तरी आपण संविधानाचे सेवक आहोत. त्यामुळे आपण मला कोणतेही सामाजिक काम सांगा मी निःसंकोचपणे करेल असे प्रतिपादन आमदार मनोज कायंदे यांनी आज १४ एप्रिल रोजी सकाळी आयोजित साखरखेर्डा येथील कार्य क्रमात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ठाणेदार गजानन करेवाड हे होते तर माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष राम जाधव, माजी समाजकल्याण सभापती बाबुराव मोरे, शिवसेना तालुकाप्रमुख ( उबाठा ) महेंद्र पाटील, माजी उपसभापती सुनील जगताप, माजी सरपंच कमलाकर गवई, उपसरपंच सय्यद रफीक, आयुबसेठ कुरेशी, युवासेना तालुका प्रमुख संदीप मगर, ग्राम पंचायत सदस्य संतोष जैस्वाल, शंकरराव उगल मुगले, रामदास सिंग राजपूत, शुभम राजपूत, गोटू कासार, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष संतोष मंडळकर, गजानन इंगळे, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम बुध्दाचार्य श्रीराम गवई यांनी बुध्द वंदना सादर केली. तर मान्यवरांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कार्य क्रमाचे संचालन सामाजिक कार्यकर्ते दिलीप इंगळे यांनी केले तर उत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष गवई, दर्शन गवई, माजी सैनिक अर्जन गवई, संदीप खिल्लारे, संदीप गवई, माजी सरपंच सुधाकर गवई, सुनिल गवई, स्वप्रील मोरे, गजानन उत्तम गवई, कचरु गवई यांचे संपूर्ण कार्यात मालाचे सहकार्य लाभले.